ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

# १२. आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षणाच्या बहुजनीकरणातील दलित मित्र दादासाहेब पाटील व कर्जत तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेची भुमिका

**प्रा. वटाणे के. आर.**
दादा पाटील महाविद्यालय कर्जत.
**प्रा. भैलुमे एच. पी.**
दादा पाटील महाविद्यालय कर्जत.

प्रस्तावना

महात्मा जोतीराव फुले यांनी निर्माण केलेल्या दिव्य परंपरेत महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारखे रयत सेवक आणि छत्रपती शाहू महाराज, श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्यासारखे राजर्षी देखील आहेत. याच परंपरेचा वारसा घेऊन दलित मित्र दादासाहेब पाटील यांनी आपले शैक्षणिक व सामाजिक कार्य केले. आधुनिक शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्जत तालुक्यात ज्यांनी रूजविले आणि विस्तारले. कर्जत – श्रीगोंदा – जामखेड सारख्या दुष्काळी भागात ज्ञानदानाचे कार्य ज्या दलितमित्र दादा पाटील यांनी केले ते अजरामर असेच होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अज्ञानाच्या खाईत बुडणाऱ्या समाजाचा कळवळा घेऊन शिक्षणप्रसार कार्यासाठी भाऊराव पाटलांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी 'रयत शिक्षण संस्थे'ची स्थापना केली. कर्मवीर अण्णापासून प्रेरणा घेऊन ग्रामीण व दुष्काळी परिसरातील मुला–मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने दादा पाटील यांनी संस्थेच्या वटवृक्षाची एक फांदी 'महात्मा गांधी विद्यालय' या रूपाने कर्जत येथे लावली. आणि नगर जिल्हयात रयतची शैक्षणिक सुरवात कर्जत येथून झाली.[१]

रयत शिक्षण संस्थेने कर्जत तालुक्यात मोठया प्रमाणात प्रबोधन घडवून आणले. आजपर्यंत सहजपणे आर्थिक व शैक्षणिकदृष्टया अंधकारमय असलेल्या या भागाला शिक्षणाच्या आधारे प्रगतीपथावर नेहण्याचे कार्य रयत शिक्षण संस्थेच्या या कर्जत तालुक्यातील शाखांनी केले आहे. दादा पाटील यांनी शैक्षणिक व सामाजिक सुधारणा अहमदनगर जिल्हयात व्हावी म्हणून कष्ट व श्रम घेतले. स्वावलंबी शिक्षणाचा प्रवाह खेडयापाडयातील सामान्य जनतेच्या दारापर्यंत पोहचला पाहीजे. हा कर्मवीर भाऊराव पाटलांचा विचार दादा पाटील यांनी गावागावात नेला होता. जिल्हयात मोठयाप्रमाणात संस्थेच्या कार्याचे व ध्येय धोरणाने पुरस्कर्ते मिळविले होते. या सहकाऱ्याच्या सहकार्यानेच शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या कर्जत तालुक्यात तसेच नगर जिल्हयात दादांनी अमुलाग्र बदल घडवून आणला. हे करत असतांना आर्थिकसमस्या निवारण्यासाठी लोकवर्गणीतून पैसा जमविला. यासाठी समाजाच्या न्याय व विवेकबुध्दीला दादांनी अहवान करून नगर जिल्हयात भाऊराव पाटीलच्या शैक्षणिक कार्यास मोठा नैतिक पाठिंबा मिळवून दिला.[२]

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

स्वांतत्र्योत्तर कालखंडात भारताच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीमध्ये अत्यंत द्रुतगतीने परिवर्तन होत असतांना तिच्याशी समायोजन साधण्यासाठी शिक्षणाचा विस्तार व प्रगती करणे आवश्यक होते. म्हणून सरकारच्या बरोबरीने खाजगी संस्था ही शाळा उघडण्यासाठी प्रयत्नशील झाल्या होत्या. अशा महत्वापूर्ण टप्प्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणेने व दलितमित्र दादासाहेब पाटील यांच्या प्रयत्नामुळे इ.स.१९४९ साली कर्जत येथील माध्यमिक विद्यालय स्थापले. आणि अहमदनगर जिल्हयातील रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला सुरूवात होऊन तालुक्यातील ग्रामीण जनतेच्या शिक्षणाची व्यवस्था झाली. रयतने प्रतिनिधी बनून अनेक सभा, सहकारी बिनसरकारी परिषदांना मार्गदर्शन केले. दादा पाटील व भाऊराव पाटील यांची भेट झाली ते वर्ष १९४८ चे होते. याच वर्षी देशात महात्मा गांधी यांची हत्या झाली होती. या महात्माच्या नावाने १०१ हायस्कूल काढीन असा संकल्प अण्णांनी सोडला होता.[3] कर्जतचे हायस्कूल हे याच संकल्पचा भाग होता. यासुमारास दादाचे वय ४८ वर्षे होते. पण हे नवीन शैक्षणिक कार्य त्यांनी आत्मियतेने स्वीकारले होते. आरंभी दादाच्या कार्याचे स्वरूप लोकांना न कळल्याने टवाळी केली. दादांनी या शैक्षणिक कार्यात भाग घेऊ नये म्हणून काशीराम पाटील (वडील) यांना कर्जत मधील एका सद्‌गृहस्थाने सल्ला दिला होता. या अशिक्षित माणसाला शिक्षणातले काय कळणार असे म्हणून दादांची अवहेलना केली गेली. महाराष्ट्र व भारताला कर्मवीर भाऊराव यांनी जी शैक्षणिक दृष्टी दिली. या ठिकाणी गरीब श्रीमंत, स्पृश्यास्पृश्य भेद नव्हता. कर्जत याच तालुक्यात नव्हेतर आसपासच्या तालुक्यातही हायस्कूल नव्हते. कर्जतच्या या महात्मा गांधी विद्यालयात जवळच्या इतर तालुक्यातील विद्यार्थी येऊ लागले. या माध्यमिक विद्यालयामुळे श्रीगोंदा, जामखेड, आष्टी, दौंड या तालुक्यातील मुलांनी सोय झाली.[4]

दादा पाटील यांच्या कष्ट व श्रमाने, रयत शिक्षण संस्थेच्या सहकार्याने आणि लोकवर्गणी व जनतेच्या प्रेमाने २० जून १९६४ रोजी मोठया उत्साहाने कर्जत कॉलेजची सुरूवात झाली. जिल्हा परिषद अध्यक्ष [illegible]राव काळे यांच्या हस्ते या महाविद्यालयाचे उद्‌घाटन झाले. प्रथम आर्टस व टी.डी. ने वर्ग उघडले होते. या कर्जत कॉलेजच्या प्राचार्य पदाचा मान श्री. एम. एम. स्वामी यांना मिळाला होता.[5] ग्रामीण भागातील महाविद्यालय असल्याने प्रथम अनेक अडचणीचा सामना करावा लागला. परंतू ग्रामपंचायतीच्या गावी असलेल्या या कर्जत कॉलेजची दादा पाटील व प्राचार्य स्वामी यांनी प्रगती केली. दुसऱ्याच वर्षी वाणिज्य विभाग सुरू केला व दोन्ही शाखा पदवीपर्यंत चालविल्या होत्या. कॉलेजच्या इमारतीसाठी दादा पाटील यांनी स्वतंत्र इमारत फंड उभारून या फंडातून वसतिगृह व कॉलेजची इमारत बांधून पुर्ण केली होती. २५ ऑक्टोबर १९६४ रोजी भारत सरकारचे संरक्षण मंत्री तथा गृहमंत्री, आणि 'रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते कॉलेजच्या वास्तुचे उद्‌घाटन करण्यात आले होते. या दादा पाटलांच्या कार्याच्या गौरवार्थ २२ सप्टेंबर १९८० रोजी या भगीरथप्रती कृतज्ञता म्हणून कर्जत कॉलेजचे नामाकरण 'दादा पाटील महाविद्यालय कर्जत' असे केले गेले.[6]

बहुजन समाजाच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटला होता. पण स्त्री – शिक्षणाबाबत काय? हा प्रश्न दादाच्या पुढे होता. स्त्री शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून दादा पाटील यांनी कर्मवीर अण्णाच्या पत्नी लक्ष्मीबाई

भाऊराव पाटील यांच्या नावाने अहमदनगरला कन्याशाळा स्थापन केली रयत शिक्षण संस्थेची नगर जिल्हयातील पहिली मुलींची शाळा होती. यातूनच पुढे कर्जत या ठिकाणी मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीने सन १९७१ साली कन्या विद्यामंदीर कर्जत हे हायस्कूल सुरू केली. ही नगर जिल्हयातील संस्थेची तिसरे मुलींचे हायस्कूल होते. दोन क्रमांकाला कोपरगावची कन्या शाळा होती.[६]

कर्जत सारख्या उजाड व ओसाड तालुक्यात रयत शिक्षण संस्थेचे रोपटे चांगले बहरले आहे. यात दलित मित्र दादासाहेब पाटील यांचे प्रयत्न महत्वाचे आहेत. अहमदनगर जिल्यातून मोठया प्रमाणात संस्थेच्या सहकार्यातूनच शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या कर्जत तालुक्यात दादांनी अमुलाग्र बदल घडवून आणला. समाजाच्या न्याय व विवेकबुद्धीला आवाहन करून दादा पाटलांनी शैक्षणिक कार्यास मोठा नैतिक पाठींबा मिळविला होता. सामान्य गोर गरिब सर्व समाजातील मुले याठिकाणी एकत्र आणून सहभोजन, सहशिक्षण, व सहजीवन या न्यायाने वागविले. श्रमदान सारख्या योजनेतून श्रम व शिक्षण यांची सांगड घातली या ठिकाणी गरिब, श्रीमंत, स्पृष्यास्पृश्य भेद नव्हता. अशाप्रकारे या संस्थेच्या साहयाने जातीपातीची बंधने तोडली गेली व बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविला. अर्थात सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय व भावनिक एकात्मता, समता बंधुता यांचे धडे विद्यार्थ्यांना दिले जातात. 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' असे आजचे शैक्षणिक तत्वे कर्जत तालुक्यातील रयतने स्थापनेपासून प्रत्यक्षात उतरवली होती. शिक्षणाने आदर्श मानव घडवता येतो आणि नवसमाज निर्मिती करता येते. हे कर्मवीर भाऊराव पाटलांचे तत्वज्ञान तालुक्यातील संस्थेच्या शाखेने डोळयापुढे ठेवून उत्साहाने व नव्या जोमाने वाटचाल चालू ठेवली आहे. स्त्री इतरांना सुखी आणि आज्ञापालन करण्यासाठी जन्माला येते व तिला कुठलेही अधिकार नसतात असा एककल्ली दृष्टीकोन दादा पाटलांनी नाकारून कुटुंब, समाज व राष्ट्र यांच्या विकासासाठी स्त्रीने उंबऱ्याबाहेर पडून विविध प्रकारचे शिक्षण घेतले पाहिजे या विचारसरणीतून स्वतंत्र कन्या विद्या मंदीर थाटले. लोककल्याणाच्या भावनेतून दादा पाटलांनी विविध क्षेत्रातील लोकांचे संघटन घडवून शैक्षणिक कार्यास वळविले. राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना रयत शिक्षण संस्थेच्या सहकार्यकर्त्या समवेत भेटले.[७]

दादा पाटील व रयतमुळे शिक्षणानंतर अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनीने व्यवसाय उदयोग, कंपन्या, खाजगी, शासकीय, निमशासकीय सेवा क्षेत्रात पदार्पण केले आहे. कृषी, समाजकारण, राजकारण या विभागतही अनेक जण यशस्वीपणे कार्य करत आहेत. त्यामुळेच समाजाचे जीवनमान उंचावले आहे. या समाजाला घडविण्याचे कार्य व शिक्षणाच्या साहयाने रयत शिक्षण संस्थेचे कर्जत सारख्या ग्रामीण तालुक्यात मोठया प्रमाणात सुधारणा घडवून आणली. शिक्षणाला जीवनाच्या संबंधीत करण्यासाठी सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परीवर्तनाचे शक्तीशाली साधन बनविले. आणि या परिवर्तनाच्या मार्गाने ग्रामीण भागात सर्वांगिण विकास केला. राष्ट्रीय उद्दिष्टे गाठण्यासाठी तालुक्यात ही संस्था सुरूवातीपासूनच कसोशीने प्रयत्न करत आहे. उत्पादन वाढ, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता, साधली. लोकशाही सबल करून आधुनिककरणाची प्रक्रिया वेगवान बनविली. आणि लोककल्याण सामाजिक व नैतिक मूल्यांचा परिपोष करून शिक्षणाचा विस्तार

व विकास केला व शिक्षणाला एक सामाजिक आशय प्राप्त करून दिला आहे. समाजातील शेवटच्या माणसाचा विकास हे महात्मा गांधीचे स्वप्न दादा पाटील व रयत शिक्षण संस्थेने प्रत्यक्षात उतरविलेले दिसते.

तळटीपा

१. प्रा.बिरबल शिंदे, प्रा.विठ्ठल मासाळ, *'कर्मवीर दादासाहेब पाटील जीवन व कार्य'* नॅशनल प्रिंटींग प्रेस, सातारा, प्र.आ.१ सप्टेंबर १९७०, पृ.क्र.१२ ते २६.

२. कर्मवीर भाऊराव पाटील आणि दलितमित्र दादा पाटील स्मारक शिल्प अनावरण सोहळा *'स्मरणिका २००१'* पृ.क्र.६४,६५.

३. पुर्वोक्त प्रा.बिरबल शिंदे, पृ.क्र.७९.

४. पुर्वोक्त 'स्मरणिका २००१' पृ.क्र.३८, ४३, ६०.

५. पुर्वोक्त प्रा.बिरबल शिंदे पृ.क्र.९७.

६. पुर्वोक्त, स्मरणिका 'ज्ञानसुर्य' २००१ पृ.क्र.३५.

७. *'कर्मज्योती'* वार्षिक नियतकालिक दादा पाटील महाविद्यालय कर्जत १९९९ पृ.क्र.३.